# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक
दिनांक – ३० जानेवारी २०१४

## मुंबई विद्यापीठात "राष्ट्रीय युवा संसद"चे आयोजन

मुंबई - महात्मा गांधी यांच्या पुण्यतीथी स्मरणार्थ संसदीय मंत्रालय भारत सरकारच्या वतीने मुंबई विद्यापीठात राष्ट्रीय युवा संसदेचे आयोजन करण्यात आले होते.लोकांनी लोकांसाठी राबविलेल्या लोकशाहीचे प्रतिकात्मक रुप यानिमित्ताने समोर आले.
मुंबई विद्यापीठाशी सलंग्नित असलेल्या महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी या राष्ट्रीय युवा संसदेमध्ये भाग घेतला.संसदीय लोकशाही प्रणालीमधील कार्यपध्दती जाणून घेण्यासाठी शपथ,श्रध्दांजली,विदेशी पाहूण्यांचे आदरातिथ्य,प्रश्नोत्तराचा तास,चर्चा,संसदीय कार्यपध्दती इत्यादी विषयांशी विद्यार्थ्यांना अवगत करण्यात आले.तसेच महागाई,दहशतवाद आणि स्त्री-भ्रुण हत्या इ.विषयांवर प्रकाश टाकण्यात आला.संसदीय कार्यप्रणालीच्या या विशेष कार्यक्रमामध्ये शासनाशी निगडीत असलेल्या आरोग्य विमा,अन्न सुरक्षा,आंतरिक सुरक्षा अशा अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

मुंबई विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या या विशेष कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी पंतप्रधान,विरोधी पक्षनेता,रक्षामंत्री,वित्त मंत्री,आरोग्य मंत्री,आणि सामाजिक न्याय मंत्री यांची भूमिका निभावली.सर्वसामान्य माणसांना भेडसावणा-या दैनंदिन प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न यानिमित्ताने विद्यार्थ्यांच्या माध्यमातून करण्यात आला.
मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय युवा संसद कार्यक्रमाचे उदघाटन बीसीयुडी संचालक प्राचार्य डॉ.राजपाल हांडे आणि कुलसचिव डॉ.एम.ए.खान यांच्या हस्ते करण्यात आले.तर चाणाक्य नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक डॉ.के.के.द्वीवेदी आणि महाराष्ट्र टाईम्सचे संपादक श्री.अशोक पानवलकर यांना विशेष निमंत्रीत करण्यात आले होते.डॉ.अविनाश ओक आणि डॉ.हर्षद भोसले यांनी विद्यार्थ्यांना संसदीय कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली.विरेन वेसूवाला यांनी पंतप्रधानांची भूमिका निभावली तर करिश्मा वेंकटेश्वर या विद्यार्थीनीने वित्त मंत्र्यांची भूमिका निभावली तर सरस्वती भंडारे या विद्यार्थीनीने विरोधी पक्षनेते यांची भूमिका निभावली.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)